# प्रकरण चौथे -

## 'अंतःस्फोट'-

## स्त्रीवादी दृष्टीने अभ्यास

## प्रकरण चौथे

### " अंत:स्फोट " स्त्रीवादी दृष्टीने विचार -

कुमुद पावडे यांचे अंत:स्फोट हे स्वकथन, यातील एकूण बारा लेखात लिहिलेल्या कांही आठवणी व अनुभव यातून प्रचलित समाजव्यवस्थे मधील किंबहुना भारतीय संस्कृती मधील स्त्रीचे जीवन चित्रण करण्याचा प्रयत्न केला आहे. या पुस्तकाच्या शिर्षकावरुनच आपणास त्यातील स्त्रीच्या गुदमरलेपणाची कल्पना येते.पण हा अंत:स्फोट इतर साहित्याहून वेगळा आहे. कारण तो फक्त भावनिक नाही तर त्यात एक वैचारिकता आहे, ते समृध्द अनुभवविश्व आहे. म्हणून पावडे पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हणतात- " एखाधा घडलेल्या घटनेतून प्रत्ययाला आलेला अनुभव किंवा एखाधा प्रसंगातून दिसलेलं व्यक्तीचं वर्तन किंवा व्यक्तिसमूहाचं वागणं, संतापजनक असेल किंवा सुखानुकूल याचा भावनांच्या पुरात गंटागळ्या न खाता तटस्थपणे विचाराच्या कसोटीवर वारंवार घासून पुसून अन्वयार्थ लावणे, समजलेल्या अर्थाने त्या अनुभवावर किंवा वर्तनावर भाष्य करणे ही प्रवृत्ती अंत:स्फोटात दिसेल." [१] - भारतीय समाज व्यवस्थेने स्त्री जातीवर किती भयानक पध्दतीने अन्याय, अत्याचार केला आहे. आणि या अन्यायाविरुध्द आवाज उठविण्यासाठी स्त्रियां जेंव्हा लेखन करु लागल्या, तेंव्हा अशा लेखनातूनच स्त्रीची एक वेगळी जाणिव, वेगळा विचार, येत असल्याचे दिसून येते. भारतीय स्त्रिया पुरुषप्रधान संस्कृतीमुळे आजपर्यंत दडपल्या गेल्या आहेत. वर्षानुवर्षे त्यांचा कोंडमारा झाल्याने मन मारण्याची सवय त्यांच्या अंगवळणी पडली आहे. त्यामुळे आपले अस्तित्वच येथे कशासाठी आहे? आपल्याला काय आवडते? काय करावेसे वाटते? आपल्या मनात कोणत्या उर्मी दाटून येतात? दरवेळी का दाबाव्या लागतात? आपल्याला जे वाटते ते व्यक्त करता येते का ? ते व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे का ? अशा एकूणच अस्तित्वाचे भान, निवडीचे स्वातंत्र्य किंवा स्वत्वाच्या साक्षात्काराची जाणिव होवू लागली, तेंव्हा संस्कृतीने भारतीय स्त्रीयांची मनं पारंपारीक रुढीनी व धर्म शास्त्रात

सांगितलेल्या व्रत वैकल्यांनी व धार्मिक धारणांनी कशी अधिक कमजोर केली जातात . आणि पतिवरच अवलंबित्व, नव-याच्या भोवती संपूर्ण आयुष्याच कथानक घोटाळत ठेवणं इ. गोष्टींचा परामर्श करुन तार्किकतेच्या आधारावर त्यांना तपासून त्यातील फोलपणा समोर मांडण्याचा प्रयत्न स्त्रीया साहित्यातून करु लागल्या. अशाच भारतीय स्त्री मनाचे चित्रण " अंत:स्फोट " मधून कुमुद पावडे यांनी केले आहे. बालपणी, बालमनाने समाजाचे झेरलेले, टिपलेले अनुभव त्यातील श्रध्दा, अंधश्रध्दा रुढी त्याचा प्रौढवयात कार्यकारी संबंध लावून तेच अनुभव, त्या रुढी परंपरांचा बौध्दिक पातळीवर तपासून त्याची सत्यासत्यता मांडण्याचा प्रयत्न आणि त्याच बरोबर प्रौढवयात जीवन जगत असताना आपल्या वाटयाला स्त्री म्हणून आलेल्या दु:खाचे चित्रण त्या दु:खाचे मूळ याही गोष्टीचा विचार या ठिकाणी केलेला आहे. हे सर्व दु:ख मांडत असतांना जे जे अनुभव आले ते वास्तवतेने मांडण्याचा प्रयत्न अगदी सुरुवातीपासून केला आहे. आणि यातून स्त्री जीवनाचे, स्त्री मनाचे चित्रण मांडण्याचा प्रयत्न केला आहे. अशा जीवनानुभवाचा, विचारांचा आपल्याला स्त्रीवादी दृष्टीने विचार करणे अपरिहार्य ठरते.

सावित्री व्रताची सांगता सांगत असताना त्यांनी भारतीय परंपरेतून चालत आलेल्या व्रताचा इतिहास सांगून त्यांचा पगडा स्त्री मनांवर आजही किती भयानक पध्दतीने आहे याचे विश्लेषण केले आहे. सावित्रीच्या पतिव्रत्याची कथा सांगून परंपरेने स्त्रीला कसे बंदीस्त केले आहे हे दाखवून या व्रताचा फोलपणा व स्त्रीचे मुस्कटदाबितून आलेले दु:ख मायाबाई नांवाच्या एका स्त्रीच्या माध्यमातून दाखवून दिला आहे. मायाबाई ही नव-याने सोडलेली स्त्री केवळ वयाच्या २५ व्या वर्षी वांझ ठरली गेली. तिच्या पतीने दुसरी बायको आणली आणि हिचा त्याग केला. अशा अवस्थेतही ती आपल्या नव-यासाठी वटसावित्रीची पूजा करते. कारण तिच्या मनावर असलेले संस्कार ती बाजूला करु शकत नाही. नव-याने कितीही छळ केला तरी " बायी माणूस म्हणजे पायातलं खेटर "[२] अशी एक समजूत त्यामूळेच ती सर्व निमूटपणे

सोसत होती. तिचे हे सोसणे म्हणजे - " एका छळाचे स्त्रीजीवन स्फुंदत होतं, छळवादी परंपरेच्या अनेक बळीपैकी एक."[3] एवढे असून त्यांच्या वर्तनात बदल जाणवत नाही. कारण त्यांना स्वत्वाची जाणीव झालेली नव्हती. आणि म्हणूनच ती या व्यवस्थाविरुध्द बंड करत नव्हती. हे जेंव्हा लेखिकेने मायाबाईच्या निमित्ताने पाहिले तेंव्हा त्यांच्या दु:खाची जाणिव झाली. ही जाणिव केवळ भावनिक नाही तर तीला बुध्दीची जोड होती. म्हणूनच त्या म्हणतात - " मन व बुध्दी वेगाळत ठेवणारं दोन तपांच सावित्रीव्रत मी धुळीसारखं फुंकर घालून उडवून दिलेलं होत. सावित्रीचा सत्यवान तिच्यावर अतिशय प्रेम करीत असे. सावित्री शिवाय दुसरी कोणतीही स्त्री त्याच्या आयुष्यात आली नसेल, तर सावित्रीनं सत्यवान जन्मोजन्मी मिळावा असा आग्रह धरला तर ठीक आहे. पण ज्या नव-याने ' बायको म्हणजे पायातलं खेटर ' एवढीच बायकोची किंमत ठेवली असेल, आपण स्वत: दुस-या बायकोबरोबर रममाण होत असताना पहिल्या बायको-कडून जर दुष्टपणे सेवेची अपेक्षा करत असेल तर असल्या नव-यासाठी बाईनं सावित्रीचा हेका धरावा हे बुध्दीला पटण्यासारखं नाही. "[4] या विचा-रातून पारंपारिक रुढींना छेद देवून पुरुषप्रधान संस्कृतीला जाब विचारण्याचे एक वेगळे धाडस लेखिकेने केलेले आहे. आणि हा विचार एका स्त्रीच्या अंतर्म-नातील एक स्फोटच होता. कारण - " संपूर्ण धर्मशास्त्र फक्त स्त्रीवर जाचक बंधन घालण्यासाठी निर्माण झालीत का. ?"[5] हा त्यांच्या पुढील एक प्रश्न होता. आणि या प्रश्नाचे उत्तर शोधणाच्या प्रयत्नातून झालेला तो स्फोट आहे. म्हणून अनेक वर्षापासून चालत आलेल्या वट सावित्रीच्या या धार्मिक लोकरुढी विरुध्द आवाज उठविलेला आहे. कारण त्यानां आता माणूस-किची जाणीव झाली आहे. त्यांच्यात स्त्रीत्वाची जाणीव झाल्यानेच - " बाई देखील माणूसच आहे. पुरुष माणसानं वाटेल तसं दडपून टाकायला, उपेक्षा करुन फेकायाला " स्त्री " ही माशी किंवा डास नव्हे ना ? उडवलं की झालं?"[6]

हा विचार रुजविण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रयत्नात मायाबाई सारखी स्त्री सुरवातीला वट सावित्रीची पूजा करणारी होती, नंतर मात्र ते व्रत ती सोडून देते. एका वट सावित्रीच्या निमित्ताने सांगीतलेला हा विचार कुमुद पावडेंच्या जीवनातील एक उल्लेखनीय गोष्ट आहे. कारण त्यांच्या प्रयत्नातून एखादी जरी स्त्री अशा जाचक सामाजिक बंधनातून मुक्त झाली तर ख-या अर्थाने ती माणूस म्हणून जगण्याच्या लायकीची होईल अशी त्यांची इच्छा म्हणूनच या लेखाच्या शेवटी त्या लिहितात – " पारंपारिक रूढीच्या झापडातून मुक्त होणा-या प्रत्येक व्यक्तीचा असाच मुक्तकंठाने गौरव करावासा वाटतो. साठ वर्षांचे निरर्थक संस्कार मी बदलले. मला अभिमान वाटतो. आनंद वाटतो, माझं बोलणं सार्थकी लागलं. आज महान व पुण्यकृत्य केल्याच्या जाणिवेन मी तृप्त आहे. ही तृप्तता अंगप्रत्यंगात तुडुंब झाली आहे. " ७ हा आनंद त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेल्या, जीवनातील आलेल्या अनुभवातून त्या जाचक रूढीतून स्त्री मुक्त झाल्याने आलेला आहे. यातून एकूणच स्त्रीला पुरुषी वर्चस्वातून मुक्त करण्याकडे लेखिकेची चाललेली धडपड आपणांस पहावयास मिळते.

अशाच प्रकारचा अनुभव त्यांनी दुस-या एका लेखातून मांडला आहे. त्या एका स्त्री संस्थेत कार्यकर्त्या म्हणून असतांना आलेला अनुभव सांगितला आहे. स्त्री संस्थेने आपले संमेलन राजधानीत घेण्याचे ठरविलेले असतांना या संमेलनाच्यावेळी केलेली स्त्रियांची भाषणे, त्यांचा विचार आणि त्यांच्या वर्तनातून आलेला अनुभव सांगितला आहे. व स्त्रीचे स्त्री म्हणून समर्थन केले आहे. खंर म्हणजे राजधानीत हे संमेलन घेण्याचा विचार म्हणजे तेथे आपल्या कांही समस्या, कांही व्यथा मांडण्याचा मुख्य उद्देश होता. पण अलिकडे निर्माण झालेल्या संस्था म्हणजे प्रतिष्ठित लोंकानी एकत्र येऊन मिरवण्याचा सोहळा असाच झाला आहे. आणि याचाच प्रभाव स्त्री-संस्थेवर पडल्याने त्यांच्यातही कांही प्रश्न मांडावेत, कांही विचार मांडावा हा उद्देश बाजूला जातो. म्हणूनच लेखिका लिहितात – "आमच्यात देखील उच्चभ्रू समाजाच्या मनोवृत्तीची विकृत ठेवणं, आकार धरू लागली तर आम्ही देखील क्लास कॉन्शसच्या

वर्तुळात अडकलो. "[८] हा क्लास कॉन्शसच सध्याच्या स्त्री चळवळीतील महत्वाचा अडसर ठरत आहे. आणि याची स्पष्ट जाणीव पावडे करुन देतात, हे महत्वाचे, कारण त्या ठिकाणी आलेल्या स्त्रिया त्यांच्या साड्या, गाड्या, बोलणे व इतर वर्तन यामुळे स्त्री मुक्ती याचा अर्थच बदलून गेला होता. ही खंत त्यांनी संमेलनात प्रथम व्यक्त करताना लिहितात. -" या समाजातून आम्ही या स्थितीला आलो त्याच्या प्रती आमची कांही कर्तव्ये आहेत, तेच मुळात विसरुन जातो, सुखसोयी, चैनीच्या बदल्यात आम्ही आम्हालाच विकायला काढतो. आणि हीच आमची दु:खांतिका आहे. "[९] ही खंत एक वेगळा विचार मांडून जातो कारण हा परिवर्तनाचा विचार एक व्यापक हेतूने मांडला जातो. पण तो विचार, ती परिवर्तनाची चळवळ देखील एका विशिष्ठ वर्तुळात सापडल्याने स्त्रीमुक्ती ही ख-या अर्थाने झाली नाही. किंबहुना ती न होण्यास स्त्रियांचा संकुचित विचार असा कारणीभूत आहे हेच स्पष्ट केले आहे. याच बरोबर या संमेलनातील झालेल्या विचार विनिमयातून असाही एक सूर येतो की स्त्री जात दलित असली तरी भारतातील दलित स्त्रीही त्या सर्व स्त्रियांत दलित आहे. हा एक वेगळा विषय विचार, दुख: या ठिकाणी कुमुद पावडे यांनी एका स्त्रीने मांडलेल्या विचारातून व्यक्त केला आहे. - " या देशातील सवर्ण आणि दलित स्त्री यांच्यात बराच फरक आहे. आम्हाला साध्या नैसर्गिक गरजांच्या पूर्तीसाठी भयंकर त्रास सहन करावा लागतो. साधा शौचकूपाचा प्रश्न, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला नाही. पॉशफ्लॅश ट्रॉयलेटमध्ये जाणा-या बायांनो तुम्ही आमचं दु:ख काय जाणणार ? आम्हाला सवर्णांच्या शेतात जाताना मालक येणार तर नाही, शिव्या तर घालणार नाही, मग एखादी पहा-यावर ठेवतो व आम्ही आमचा विधी उरकतो , ही आमची दशा आहे. हे गावाबाहेरच्या गंदगीतील झोपड्यांमध्ये सडलेल्या सांड-पाण्यातील किड्यांसारखं आम्ही राहतो. कधी आमचा विचार तुमच्या मनात येतो ? आमच्या स्त्रियांवर बलात्कार होतात, स्त्रिया म्हणून तर होतातच, पण सूड म्हणूनही होतात. दलित स्त्रिया आमच्या मालकीच्या आहेत ह्या हेतुनेही होतात. केवळ गरीबीचे कारण नाही बायांनो, आमची जात देखील आमच्या

त्रासाचं, शोषणाचं कारण आहे. " १० – या विचाराने स्त्रीवादी चळवळीला एक वेगळे परिणाम देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे आणि तो महत्वाचा आहे. या एका विचारातून संपूर्ण दलित स्त्रीचे समाजातील असणारे स्थान स्पष्ट दिसू लागते.लिंग भेदामुळे स्त्री म्हणून होणारी तिची अवहेलना त्यातच दलितत्व माथी मारल्यानं आणखी झालेला तिचा कोंडमारा हा कल्पनेपलिकडील आहे. हा विचार कुठून आणलेला नाही. तो उसनाही नाही. प्रत्यक्ष जीवनानुभव आहे. म्हणून ते एक उघड सत्य आहे. या सत्यामागे एकच गोष्ट आहे ती म्हणजे धर्मधर्माच्या नांवाखाली झालेला पुरुषी स्वार्थी बाजार त्यामूळे येणारे स्त्रियांना बाजार स्वरूप याचा प्रखर निषेध त्या येथे करतात. हा निषेध धर्म, जात आणि परिवर्तनाचा आव आणणारे साम्यवादी यांच्या बद्दलचाही आहे. याचे कारण सांगताना एका स्त्रिचा विचार महत्वाचा आहे. –

" राजधानीत हुंडयाच्या प्रश्नांवरून कांही मुलींनी आत्महत्या केल्या, तर कांहीना जाळून टाकण्यात आलं. त्यामुळे आम्ही पुरोगामी स्त्रियांनी आंदोलन केलं. हुंडयाच्या या दुष्ट रूढीला धर्मानं हातभार लावला, म्हणून आम्ही धर्माच्या व स्मृतीच्या निषेधावर घोषणा दिल्या. त्या वेळेस आमच्या जेष्ठ कार्यकर्त्यांनी आम्हाला तसं न करण्याबद्दल सुचवलं. का तर म्हणे धर्माला आपण हात लावला, तर आमच्याबद्दलचं जनमत वाईट होईल. " ११ असे धर्मातील साम्यवादाचे राजकिय गणित असते. जसा या व्यवस्थेवरील हा प्रखर विरोध आहे, तसा या व्यवस्थेला खतपाणी घालणा-या कांही स्त्रीप्रवृत्तीवरही आहे. कारण एका प्रतिष्ठेच्या विळख्यात अडकलेली स्त्री भोवतालच्या वास्तवाकडे पाहण्यास तयार नाही. त्यामुळे त्या संमेलनातून आलेल्या अनुभवातून पावडे आपली खंत व्यक्त करताना दिसतात. पुरूषांची स्त्रियांकडे पाहण्याची वृत्ती आणि धर्माच्या नांवाखाली राजकीय गणित मांडून आपले वर्चस्वच कसे कायम राहिल या दृष्टीने पुरूषांनी स्त्रीयांची केलेली कुंचबना येथे त्यांनी दाखवली आहे. त्याचबरोबर स्त्रीमुक्तीचा विचार येत असतांना तो विचार पुर्णपणे स्त्रिने स्विकारलेला नाही, कारण भारतीय मनांवर पारंपारिकतेचा पगडा असल्याने तो ती झुगारून देवू शकत नाही. हे यातून दाखविले आहे.

भारतीय समाज व संस्कृतीमध्ये ज्ञानाची मिरासदारी एका विशिष्ठ वर्गाकडे होती. त्यामूळे स्त्री शुद्रांना ज्ञानाचा अधिकारच नव्हता पण नंतरच्या कांही परिवर्तनवादी विचाराने समाजातील तळागाळातील लोकांनाही शिक्षणाची दारे खुली झाली, पण असे झाले असले तरी या शिक्षणामुळे त्यांच्याकडे बघण्याची समाजाची दृष्टी आणि अशा समाजप्रवृत्तीचे चित्रण कुमुद पावडे यांनी " माझ्या 'संस्कृत'ची कथा " या लेखनातून मांडली आहे. कुमुद पावडे या संस्कृतच्या प्राध्यापिका झाल्या. संस्कृत हा विषय एका विशिष्ठ जातीतील लोकांचा विषय, पण एका दलित व्यक्तीने त्याचे ज्ञान घ्यावे आणि हेही एका दलित स्त्रिने हे समाजमनाला बोचणारं असंच होतं, त्यामुळे त्यांच्याकडे कांही होकारार्थी तर कांही वेळा नकारार्थी दृष्टीने समाज पहात असतो. अशा या संस्कृतच्या प्राध्यापिका म्हणून आलेला अनुभव त्या येथे व्यक्त करतात. हा अनुभव व्यक्त करतांना आपल्या बालपणी देखील आपल्यास मिळालेली वागणूक याचा उल्लेख त्या करतात. बुध्दीने हुषार, राहणीमानांत उच्च तरीही केवळ दलित म्हणून उपेक्षा, त्यामुळे लहानपणापासूनच अशा वर्तनाचा ठसा त्यांच्या मनांवर उमटल्याने संस्कृत हा विषय त्यांनी निवडला, पण केवळ ज्ञानाने माणूस उच्च होत नाही तर जन्माने ही येथील पध्दती. म्हणूनच कुमुद पावडे यांच्याकडे" त्यांच्या गुणवत्तेऐवजी त्यांच्या जन्माचा आधार घेवून लोक बघू लागले. याची खंतही एक ठिकाणी त्या व्यक्त करतांना लिहितात -" गुणवत्तेवरच कौतुक होत होतं आणि प्रोत्साहन मिळत होतं. कांही लोकांना ते कदाचित मनातूनही आवडही नसावं. पण ते त्यांनी उघडपणे कधीच दर्शविलं नाही. मला फक्त एकच गोष्ट खटकावयाची ती ही की, मिळणा-या स्कॉलरशीपचा उध्दार. " स्कॉलरशीपच्या जीवावर उडया आहेत हया: " सरकारच्या पैशानं माज आलाय " चपराशापासून तो तहत मोठया लोकांचा हाच दृष्टिकोन. " १२ - असा दृष्टीकोन म्हणजे एका दुर्बल मानसिकतेचा दृष्टिकोन, एक प्रवृत्ती आणि अशा प्रवृत्तीमुळेच त्यांना जिथे तिथे अडथळा येवू लागला. असे असून देखिल त्यांनी जिददीने शिक्षण

घेतले त्यामुळे त्यांना वाटते की इतके चांगले मार्क्स मिळाल्याने आपल्याला नोकरीही चांगली मिळेल. पण तसे झाले नाही. कारण कल्पना आणि व्यवहार यांचा प्रत्यक्ष वेगळा अनुभव त्यांना येवू लागला. पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रियांची चालवलेली सर्वच क्षेत्रातील पीछेहाट शैक्षणिक क्षेत्रातही त्यांना दिसून आली. एक बुध्दीमान स्त्री असून केवळ दलित स्त्री असल्याने त्यांची कुचंबना झाली. त्यांनी अनेक ठिकाणी नोक-यासाठी प्रयत्न केला. सर्वत्र अपयशच आले. पण जेंव्हा कुमुद पावडे यांनी आंतरजातीय विवाह केला त्यानंतर त्याना प्राध्यापिका म्हणून नोकरी मिळाली हे स्पष्ट करतांना त्या लिहितात – " कुमुद सोमकुंवरच्या नावानं मिळालेली नोकरी हे तिचं श्रेय नाही, तर श्रेय आहे कुमुद पावडेचं. पतीच्या नावानं पत्नीचं नाव आणि तिची जातही बदलते असं ऐकते. आणि म्हणून म्हणते संस्कृत प्राध्यापकीचं श्रेय सौ. कुमद पावडेच्या तथाकथित सवर्णतेला आहे. अजूनही वंचित आहे, तिच्या पूर्वाश्रमीची जात."[१३] – आणि एकूण त्यांच्या या लेखनातून याचा प्रत्यय येतो म्हणजे आज जग इतक्या पुढे गेले तरी भारतीय मन बदलले आहे, का ? याचा पडताळा घ्यावा लागतो. या समाजात बुध्दीमता देखील जातीच्या निकषावर तपासली जाते. असेच म्हणावे लागते.

ज्या महाराष्ट्रात फुल्यांसारखा सामाजिक पुरस्कर्ता होऊन गेला, त्याच महाराष्ट्रात जातीयता, स्त्रियांचा छळ, बुवाबाजी असे अनेक प्रश्न निर्माण होताना कुमुद पावडे यांनी पाहिले. तेंव्हा त्यांना फुले जन्माविषयी शंका वाटते. असा माणूस होऊन गेला यावर विश्वास बसत नाही. कारण त्यांनी जो इतिहास लिहिला तो पहात असताना व आजच्या वास्तवाबद्दल विचार करताना मन सुन्न होऊन जाते. खरंच फुले होऊन गेलेत का ? असा प्रश्न लेखिकेला पडतो. कारण त्या फुल्यानंतरच्या काळ जवळून पहात होत्या व अनुभवत होत्या असे अनुभव त्यांनी " खरंच फुले होऊन गेले का ? " या लेखात ै मांडले आहेत. दरवर्षी फुले जयंती करायची. त्यात त्यांची मिरवणूक सभा, भाषणे, जयघोष इत्यादी प्रकार असतात. पण प्रत्यक्ष व्यवहार करताना

मात्र रुढी परंपरेचा विचार. त्यामुळे फुल्यांचा समाज परिवर्तनाचा विचार हा केवळ कागदोपत्री भाषणबाजी पुरताच मर्यादीत राहिला. म्हणून ज्या फुल्यांनी अस्पृश्यांसाठी हौद खाली केला, त्या फुल्यांच्या समाजात आज स्पृश्य-अस्पृश्य दंडक आहेत. ज्यांनी स्त्री शिक्षणासाठी अहोरात्र झटले, तेथे स्त्रीयांच्यावर दिवसा ढवळ्या बलात्कार होत आहेत हे जेंव्हा लेखिकेने पाहिले, तेव्हा काही कटू अनुभव आले त्याचे वर्णन खरंच फुले होवून गेले का ? या ठिकाणी केले आहे. इतकेच नव्हे तर जेंव्हा त्याचा आंतर्जातीय विवाह होत होता, तेंव्हा त्याचे दीर त्यांच्या लग्नात पुढे होते पण नंतर त्यांनी त्यांच्या विषयी आकस व्यक्त केला. म्हणूनच त्या लिहितात -" आमच्या लग्नाच्या वेळेस याच दिरांनी आव आणून पुढाकार घेतला होता. फुल्यांच्या तत्वांचा उद्घोष केला होता. फुल्यांप्रमाणें ब्राम्हणी धर्माला शिव्यांची लाखोली वाहिली होती आणि असलीच मंडळी मला म्हणायची 'बोलकी मंडळी फार अस्तित्वात आलेली आहेत आणि फुल्यांना नेस्तनाबूतच केलेलं आहे"[१४] असे असले तरी प्रत्यक्ष कृती व विचार यांच्यातील तफावत या ठिकाणी दिसून येते. याचे स्पष्टीकरण देतांना त्या पुढे लिहितात - " अस्पृश्यता निवारणाचा कायदा कायदेगृहात पास करून ज्यांनी प्रभावपूर्ण भाषणे केली असतात. तेच खाजगी बैठकीत सांगतात, 'काय, सालं बोलावं लागतं खरं परंतु हे बोलणं कंठापर्यंतच मर्यादित असतं. खरं तर अगोदरच हे लोक इतके माजले आहेत, त्यांना काय आता डोक्यावर बसवून घ्यायचं आहे ?' मी जेंव्हा शाळा कॉलेजात शिकले त्याही वेळेस, ' बाई ', ' सर ' बोलत असत. स्कॉलरशिप मिळायला लागल्यापासून ही पोरं चढलीत आणि जेव्हा मी प्राध्यापक झाले तेव्हाही इतर सहका-यांना हेच बोलताना बघते. 'ह्यांच्या स्कॉलरशिप्स आता बंद करायला पाहिजे, पास होऊन नोक-यांत आरक्षण मागतील म्हणून कॉलेजच्या चाळणीतूनच त्यांना अटकविण्याचा प्रयत्न होतोय आणि त्या विषयाचे मार्क्स, प्रॅक्टीकल्स विषयावर अवलंबून असतात ते शिक्षक तर अतिशय हेवे दावे साधत असतात. खरे निरपेक्ष, निस्पृह शिक्षक वगैरे पुस्तकात मुंडाळले जात आहेत. -"[१५] अशा प्रवृ-ती मुळेच फुल्यांचा विचार हा मागे पडत आहे. यासाठी केवळ समाजातील दोषी पुरोगामीच जबाबदार नाहीत, तर ज्याच्या प्रयत्नाने या

देशात स्त्री शिक्षीत झाल्या त्यांच्या ठिकाणी तरी फुल्यांचा विचार रूजला का ? असा प्रश्न उपस्थित करून कुमुद पावडे यांनी स्त्रीयांच्यावरही टिकास्त्र सोडले. त्या लिहितात -" मुलींनी शिक्षण देता यावे म्हणून " लोकांच्या थुंकी " अंगावर सहन करणा-या सावित्रीबाई कुठे आणि मांगामहारांच्या मुलींना शिक्षण देताना नाकतोंड शिसाराने तरकावणा-या 'अत्याधुनिक' शिक्षिका कुठे! ज्याच्या क्रांतिकारी पावलांनी आजची महाराष्ट्रीय स्त्री शिक्षणाच्या व समतेच्या बाबतीत पुरूषांशी समतोल राखू इच्छिते, ती स्त्री फुल्यांच्या उद्दिष्टापासून ढळतेच, हे म्हणणे वावगे होईल काय ? खरे तर ही बेइमानीच नाही काय ?"[१६] म्हणजे ज्या उद्दिष्टांनी त्यांना शिक्षण दिले ते उद्दिष्टच कुणी लक्षात घेतले नाही. आणि म्हणून स्त्रीयांच्यात संकुचितपणा, जातीयता दिसू लागली आहे. असा एक वेगळा पण स्पष्ट विचार मांडलेला आहे. असे म्हणत असतानाच ज्या स्त्रिया शिकल्या, सवरल्या त्यांना तरी त्यांच्या हक्काची जागा मिळते का ? हाही प्रश्न उपस्थित केला आहे. कारण स्त्रिला स्त्री म्हणून उपेक्षिले जाते. त्यात जातीच्या आधाराने आणखी उपेक्षित केले जातात. त्यामुळे "जातीचा उल्लेख जास्त भयानक आहे. एक शरीरच गाळतो पण दुसरा शरीर, मन, बुध्दीही गाळतो."[१७] ही सारी व्यवस्था पाहिल्यामुळेच त्या लिहितात- " हया देशात तोंडी जाहीरनामे फार निघतात. परंतु कृतीत भ्रष्टाचार असतो. किती दिवस सहन करायचे ? आणि का ? कशासाठी ? वर्षानुवर्षे मुकाट सोसत रहायचे, नियती म्हणून मुर्खासारखे ? आपला विद्रोह बलिदानाच्या बाजीवर जर प्रकट केला तर समाजाला हादरा का बसावा ? लाचारीने जगणा-यांपुढे हया समाजाने वाळलेला, बुरशी चढलेला तुकडा फेकला, त्या तुकडयाला जर एखाद्याने ठोकरले तर तो 'माजलेला' बनतो. माझ्या मते ' असे माजलेले' आज भारतभर अनेक हवे आहेत. ज्या भूमीत आपण जन्मतो, त्या भूमीचे सारे माणुसकीचे हक्क आपल्याला मिळायला हवेत. मुलभूत हक्कासाठी लाचारी का धरावी आम्ही ?"[१८] ही लाचारी एका जागृत स्त्रीने झिडकारली आहे, की जी आज स्वत्व ओळखली आहे. स्त्रीला आपल्यातील माणूसपणाची जाण आलेली आहे. आणि भोवतालच्या जगाचा तिला तिरस्कार आहे. हा तिरस्कार वर्षानुवर्षे दबलेल्या घुसमटलेल्या मनातून व्यक्त होतांना दिसतो. त्याचे कुमद पावडे एक प्रतिक आहे.

कुमुद पावडे यांनी आपल्याला आलेले अनुभव आणि त्यांच्या कांही आठवणी सांगत असतानाच आपल्या आयुष्यात ज्या ज्या व्यक्ती झाल्या जे जे प्रसंग उद्‌भवले त्या स्पष्टपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. अशा एक स्त्रीच्या भेटीतून आलेला अनुभव त्यांनी 'बंधनाच्या पलिकडे' या लेखातून मांडला आहे. लेखाच्या शिर्षकातूनच त्या कथेचा आशय कळण्यास मदत होते. यातील 'सुनीता' नांवाची एक स्वतंत्र विचाराची तरुणी जीला आजचा समाज व्यवहार मान्य नाही. म्हणूनच या सामाजिक बंधनातून मुक्त होण्यासाठी स्वत:हून एका दलित मुलाशी विवाह करण्यासाठी घरातून पळून जाते. आणि जेंव्हा त्या दोघांना जबाबाला पोलिस स्टेशनमध्ये आणले जाते तेंव्हा जबाब देत असताना तिचे विचार, तिचे बोलणे, तिचा बोलण्यातील आवाज यामुळे कुमुद पावडे यांना तिच्याबद्दल एक वेगळीच जाणीव होते. तिच्यात असणारी वैचारिकता, तिची माणूस म्हणून जगण्याची वृत्ती या सर्व गोष्टी तिच्या संवादातून स्पष्ट केल्या आहेत. ती म्हणते - "आई तू माझं लग्न एका बिजवर प्रोफेसरशी करायाला निघाली होतीस. तो घरचा खूप श्रीमंत होता, गाडी होती, बंगला होता. तू म्हणाली होतीस, 'थोडा काळा आणि वयानं १५-२० वर्षानी मोठा असला म्हणून काय झालं ? माझ्या कोवळ्या मनाचा, माझ्या भावनाचा देखील विचार करायला तू तयार नव्हतीस आणि म्हणून मी ठरवलं, प्रकाश बेकार असला तरी, बौध्द असला तरी आपल्या वयाला शोभेल असा आहे. चांगला हॉकी पटू आहे. मुख्य म्हणजे हॉलीवूडच्या सिने नटासारखा देखणा आहे. अनेक श्रीमंत घरच्या सुंदर सुंदर मुली माझ्याच कॉलेजमधल्या त्याचा पाठलाग करत होत्या हे मी पाहिलं होतं. हा मिळवता आला तर ह्या शिवाय मोठं भाग्य नाही. मी व्यक्तीशी लग्न करायला निघाले होते. जातीशी नाही."[११] या तिच्या उद्‌गाराने जसे लेखिकेला तिच्या वेगळेपणाची जाणीव होते तसे वाचकालाही होते. असे असले तरी एक स्त्री म्हणूनही तिचे वेगळेपण दिसते. तिचे लग्न होते. जेंव्हा तिच्या डोळ्यातून अश्रू येतात तेंव्हा तिच्या स्त्रीत्वाची जाणिव होते अशा स्वतंत्रतेने विचार व कृती करणा-या सुनीताचे लेखिकेने "बंधनाच्या पलिकडे" असे शिर्षक देऊन चित्रण केले आहे.

दलित साहित्य संमेलनाच्या वेळी एका काव्य वाचनातून स्फुरलेला म्हणजे निषादाने क्रौंचपक्षाचा वध केल्यामुळे त्याला वाल्मीकी सारख्या महाकविने दिलेला शाप आणि त्यामुळे भोगावे लागणारे दु:ख याचे वर्णन मानिषाद या लेखात आहे. निषाद व वाल्मिकी हे या ठिकाणी प्रतिक म्हणूनच येतात. त्यातून लेखिकेला तत्कालीन समाजस्थितीचे दर्शन घडवायचे आहे. ज्या समाजात प्राणीमात्रांना किंमत आहे, पण माणसाला नाही. जीथे प्राण्याचा विरह भाव पाहिला जातो पण माणसाच्या भूकेची तिव्रता कळत नाही. अशा या समाज व्यवस्थेमध्ये असणारी जातीयता विषमतेवा एका प्रवृत्तीचा सुरवातीलाच धिक्कार केला आहे. "वृत्ती, प्रवृत्तीचा आम्ही जेंव्हा विचार करू तेंव्हा आम्हाला वाल्मिकीसारख्या दिव्य तेजाचे लोक ठिणग्याही वाटत नाहीत. कारण ज्या कवीच्या जाणिवेत पक्षाला स्थान आहे. मुक्या जिवाच्या आक्रंदनाला अर्थ आहे, विचार,भावना वगैरे नसलेल्या तीर्यक योनीतील जीवाचं भावविश्व ज्याला सजग वाटू लागते, पक्षाच्या घायाळपणानं जो घायाळ होतो अपु-या काम मोहित अवस्थेतील अतृप्त वेदना ज्याला जाणवते,प्रेयसीचा वियोग झालेल्या प्रियकर क्रौंचाचे विरहदु:ख जो आपलस झालेला पाहतो त्या कवीला माणसाचं दु:ख, हलबलता मात्र कळत नाही. कारण त्यांच्या जाणिवेच्या जगात पीडित, दरिद्री दलित माणसाला स्थान नाही."[20] एका विशिष्ठ प्रवृत्तीचा या वर्णव्यवस्थेतून आलेल्या व्यक्तीचा विचाराला माणूसकिचा स्पर्शही नाही याचे स्पष्टीकरण यातून होते. कारण या ठिकाणी लेखिका म्हणते -" परंतु त्यांच्या काळात एक जाणीव निश्चितच होती. निषादाला शाप देण्यापूर्वी तिने कवीच्या मनाला स्पर्श केला असता तर त्यांच्या तोंडून ही शापवाणी बाहेर पडली नसती. "जीवो जीवस्य जीवनम्" ही ती जाणीव हे जगण्याचं तत्वज्ञान निषादानं अंगिकारलेलं होतं. किंबहुना समाज व्यवस्थेत देखील शिकार हेच त्यांच्या जगण्याचं साधन ठरलेलं. शिकारीवरच त्याची पोरं बाळं जगतात. एकदा जरी विचार वाल्मीकीच्या मनात आला असता तर शाश्वत प्रतिष्ठा तुला प्राप्त होणार नाही असे शब्द कोमल व संस्कारक्षम वाणीतून बाहेर पडले नसते. पोरंबाळं जगवण्यासाठी केलेली शिकार निर्दय कशी ? कुरून पक्षी टिपणा-या निषादाला पक्ष्यांची मोहित अवस्था दिसावी तरी कशी ?

आणि शिवाय भुकेनं आंधळ्या झालेल्या जाणिवेला सूक्ष्मता, भावं तरलता आदी कांही कळत नाही. तिला एकच कळतं आणि ते म्हणजे पोट. परंतु सूक्ष्मदर्शी विश्व अनुकंपा असणा-या ऋषीकडून शाप दिलाच गेला"[21] ही घटना एका विशिष्ठ प्रवृत्तीतून निर्माण होते कारण जो ऋषी त्या निषादाला शाप दिला त्याच निषादाची भूक त्याचे जीवन याचा त्याने विचारच केला नाही. कारण त्याला त्याचे वास्तवच दिसत नव्हते. मग त्याच्या भूकेचे तर काय ? अशा या ऋषीने सुवर्णमृगाच्या पाठीमागे धनुष्यबाण घेऊन जाणा-या रामाचे मात्र कोड कौतुक का करावे ? असा प्रश्न लेखिका उपस्थित करतात आणि हा प्रश्न ही व्यवस्था दाखविणारी सुचित करणारा आहे. कारण आज या समाजातील विषमता ही या वाल्मीकीच्या तत्वावर आधारलेली आहे. ती बुध्दीभेद करणारी आहे. म्हणून अशा व्यवस्थेला व व्यवस्थेतून आलेल्या साहित्याचाही त्या धिक्कार करतात. कारणं त्यांची अपेक्षा आहे ती "- माणूसकीच्या जगात माणसालाच प्रथम स्थान असावं.पक्षी, मुंग्या, गाई, मासे इत्यादी करुणेचे विषय आमच्यानंतर असावेत. येथे पक्षांची कदर केली जाते. चिमण्यांना दाणे टाकले जातात. कावळ्यांना पिंड दिला जातो. मुंग्याना साखर दिली जाते. गाईला घास दिला जातो, वानरांना फुटाणे दिले जातात व माशांना ओल्या कणकीचे बारिक गोळे सोडले जातात. पाण्यात, पण माणसाच्या पोराला चतकोर तुकडा कच-याच्या पेटीतील पत्रावळ्यावरून उचलताना देखील कुत्र्याप्रमाणें प्रतिष्ठेच्या लाथाबुक्याही सहन कराव्या लागतात. असल्या प्रतिष्ठेची आम्हा किळस वाटतो, घाण वाटते."[22] म्हणून त्या शेवटी निषादाला म्हणतात- "हे निषादा, प्रतिष्ठेसाठी तू देखील कातर बनू नकोस."[23] एकूणच माणूसपणाची प्रतिष्ठा या ठिकाणी अभिप्रेत आहे. ही प्रतिष्ठा स्त्री पुरूष दोघानाही तितकीच आवश्यक आहे आणि यासाठीच लेखिका या विचारांची पुनरावृ-ती करते. हे विचार म.फुले यानी स्पष्टपणे मांडले आहेतच. म्हणून त्यावेळी विचारांची बैठक म.फुले यांच्या लिखाणात आढळते.

शरदऋतूतील एकाच दिवशी आलेले तीन वेगवेगळे अनुभव जे लेखिकेला आणि त्यातून बाबासाहेबांनी जातीविषयक जे विचार मांडले होते तो विचार समाज

मनातून किंबहुना त्याच जातिच्या लोकांवर किती प्रमाणात स्वाग होतो. याची प्रचिती येते. आयुष्यभर जाती- धर्म, याच्यावर प्रखर टिका करणारे बाबासाहेब आणि त्याचाच परिवर्तनाचा गाडा पुढे नेणारे त्यांचे अनुयायी यांच्या विचारातील झालेला बदल हा कितपत आंबेडकरांच्या विचाराशी जुळणारा आहे? असा एक प्रश्न पडतो. आणि लेखिकेला अशा विचाराचे कांही अनुभव प्रत्यक्ष पहायला मिळतात. आणि म्हणूनच त्यांनी शरदातील त्या दिवसात भेटलेल्या व्यक्ती, त्यांचे विचार आणि त्या अनुषंगाने आलेले सामाजिक दर्शन याचा उल्लेख ते शरदातील एक सकाळ, दुपार आणि संध्याकाळ, या लेखात करतात.

लेखाच्या सुरवातीलाच भेटलेल्या नंदेश्वर आजी – त्या आजी म्हणजे कणखरपण बोलण्यात व चालण्यात एक विशिष्ठ लकब असलेलीअडाणीच पण बाबासाहेबांचे भाषण ऐकल्याने परंपरेला न मानणारी एक जागृत स्त्री म्हणूनच "कोंडयाचा मांडा करीन पण पोरीबाळींना अनाडी ठेवणार नाही."[२४] अशा प्रखर विचाराची ती स्त्री तीने आपल्या मुलींना शिक्षण दिले. आणि जातीयता मोडण्यासाठी आपल्या मुलीचं लग्न एका धोबी समाजातील शिक्षीत मुलाशी करुन दिलं. तिचे हे विचार मात्र समाजातील तथाकथीत लोकांना पटणारे नव्हते. म्हणूनच तिची लोक अधूनमधून टिंगल करीत असत. इतकेच नाही तर तिच्या मुलीच्या लग्नात घातलेला धुडकोस हा या प्रवृत्तीचा उच्च बिंदूच म्हणावा लागेल. आजपर्यंत विशिष्ठ वर्गातलेच लोक जातीच्या लोकांना त्रास देत असत असा समज होता तो मात्र आज खोटा वाटतो. कारण असे म्हटले आहे की जातीला जात वैरी असते. आणि म्हणूनच लेखिका म्हणतात की "ब्राम्हण, मराठेच त्रास देत नाहीं, तर एका जातीतले लोक आपल्याच जातीतल्या लोकांना कसे अमानुषपणे छळतात त्याचं उदाहरण म्हणजे कौसल्याचं लग्न."[२५] असा हा लग्न सोहळ्यातील अनुभव म्हणजे जात नष्ट झाली पाहिजे म्हणणा-यानी जात सोडलीच का ? हा प्रश्न उपस्थित करतो. आणि म्हणूनच बाबासाहेबांचा विचार कांहीनी अंगीकृत केला त्याचप्रमाणें वर्तनही करण्याचा प्रयत्न केला. पण अशा सामाजीक प्रवृत्तीला मात्र तोंड द्यावे लागते आणि अशा प्रवृ-तीला एका जागृत स्त्रीला देखील बळी पडावे लागते.

अशी जातीच्या विळख्यात सापडलेली माणसं, व्यक्तीच्या बुध्दीमत्तेशी, त्यांच्या विचाराची कदर करत नाहीत. तो कितीही शिकला, विचारवंत झाला तरी लोक त्याच्याकडे पहातात. ते प्रथम त्याची जात म्हणून अशा या प्रवृत्तीला देखिल एक विव्दान भास्कर नंदनकार बळी पडतो. त्याचे प्रेम एका ब्राम्हण मुलीशी असते. तो तिच्याशी लग्न करणार असतो पण त्याच्या आड येते त्याची जात कारण मुळात हा धोबी आणि ते ब्राम्हण म्हणजे अगदी दोन टोकेच ती जुळणार कशी ? त्यात ब्राम्हण म्हणजे अत्यंत वरचे टोक अत्यंत अभिमानी म्हणून लेखिका म्हणते – "किती ब्राम्हणाचा अभिमान. केवळ जातीनं ब्राम्हण असलं की झालं. वृत्ती ही किती वहाटळ, हिंस्त्र आणि हिन असली तरी चालेल. खर तर हा उपनयनच असा संस्कार आहे. की ज्यानं माणूस माणसापासून वेगळा केलाया एकाला दुस-यापासून फोडलं, नव्हे एकाला श्रेष्ठ केलं, एकाला हीन केलं, खरं माणसाला विद्रुप करणारा संस्कार तो शरीरानं आणि मनानं देखील."[२६] ज्या संस्काराचा आपण स्वाभीमानानं विचार करतो तो संस्कार माणूस घडवितो का ? याचे उत्तर या वाक्यात आपणांस सापडते. या दोन अनुभवा बरोबरच लेखिकेला त्याच दिवशी झालेला सायंकाळचा अनुभव मात्र त्या शरदातील आनंदासारखा सुखावतो. त्यातून आलेला विचार हा एक वेगळा अनुभव देऊन जातो. या ठिकाणी देखिल जात, लग्न यासारखे विषय आहेत पण त्यातून माणसाच्या बुध्दी आणि विचारात झालेला बदल हा वैचारिक असा लेखिकेला वाटतो. कारण एका भंगी जातीतील लोक बौध्द धर्म स्वीकारून बाबासाहेबांच्या विचाराने प्रवृत्त झाल्याने एका बौध्द मुलाशी विवाह स्थळ शोधताना दिसतात. म्हणून लेखिका म्हणते – "आंबेडकरवादी स्वत:ला म्हणून घेणा-या पण मनानं आंबेडकरी विचाराचा अस्वीकार करणा-या त्या नवतरुणाचे रुढीवादी विचार ऐकून जो विषाद वाटला होता तो विषाद या लोकांच्या दर्शनानं कापरासारखा जळून गेलाय."[२७] आणि अशा विचारी माणसाची आज गरज आहे म्हणून ती सायंकाळ त्यांना अशी माणसं म्हणजे शरदातील सायंकाळचे उदासिनवार घेऊन आलेली आहेत असं वाटतं.

" मला अहेव मरण नकोच " असे शिर्षक असलेल्या एका लेखात कुमुद पावडेंचा एक प्रखर विचार पहायला मिळतो. आपल्या भारतीय संस्कृतीन स्त्रीयांना असणारे

स्थान आणि त्यांना मृत्युनंतर मिळणारे स्थान याचे एक अजब गणित आहे. कारण स्त्रीला व शुद्रांना दास्यांशिवाय दुसरे स्थानच नाही. आणि म्हणून तीने आयुष्यभर पुरुषी वर्चस्वाखाली रहायचे हा परंपरावादी विचार आणि स्त्रीया मृत्युदेखील पुरुषी वर्चस्वानेच व्हावा ही एक दृष्टी म्हणजे स्त्रीचा पती जिवंत असतांना जर तीला मरण आले तर ती सौभाग्यवती म्हणून गौरविली जाते. पण जर तिच्या अगोदर पतीचा मृत्यु झाला तर तीला अभागीनी विधवा म्हणून जगावे लागते. हा एक विचार आजही स्त्रीमनांवर पडला आहे. तो विचार आज ब-याशा स्त्रीया प्रामाणिकपणे स्विकारतांना दिसतात. पण कुमुद पावडेंसारख्या जागृत स्त्रीकडून याचा तिरस्कार केला जातो. म्हणूनच ती क म्हणते "मला अहेव मरण नकोच" कारण अहेव मरण ही एक पुरुषी संस्कारातून आलेली कल्पना आहे. आणि त्याची कल्पना म्हणजे स्त्री ही दास्य आपल्या सेवेसाठीच तिचा जन्म म्हणून तिला एका विशिष्ठ चाकोरीत बसविले आहे. हे करताना तिला तिच्यावर होणा-या अन्यायाची पुसटशी देखील कल्पना होऊ दिलेली नाही. कारण-"स्त्रीला सुंदर सौभाग्य लेण्याच्या गोंडस भूल थापा देऊन एका विशिष्ठ मोहनिद्रेत ठेवलं गेलं. सुबक घडणीच्या हि-या मोत्यांच्या दागिनांच्या मोहक प्रलोभनात गुंतवून तिला गुलाम बनवलं गेलं. आजही ही दागिन्यांची आसक्ती लक्षात घेता स्त्रीला देखील तिची ही मानसिक गुलामगिरी प्रिय आहे. असं म्हटल्याशिवाय राहवत नाही. " चांगलं चुंगलं खा, मुडधाभर अन्नात रहा, चांगले चुंगले नेस, खूप सोन्याच्या दागिन्यांची मढव स्वत:ला आणि घरात लक्ष दे. बाहेरच्या जगासाठी तुला बंदी आहे. ते तुझं क्षेत्र नव्हे" असं पसवं शास्त्र राबवून तिच्यातील सारासार विचारशक्तीच पार नष्ट केलीय. पतीच्या अस्तित्वातच तुझे अस्तित्व विलीन होऊ दे. तोच तुझा सर्वाधिकारी आहे. त्याच्याशिवाय तुला गती नाही. त्यांच्या मृत्युनंतर तुला किंमत नाही. तुझं जीर्ण पोते-यासारखं आहे. एवढंच नव्हे तर अहेव मरणाची गोंडसकल्पना तिला देवून वाईटासाठी देखील त्याग करण्यात तुझं हित आहे असं सारखं सारखं बिंबवल गेलं. आणि या अहेव मरणाचा कल्पनेनं झपाटलेल्या स्त्रिया, विवाहित स्त्रिया, मेल्यावर त्यांना तिरडीवर नमस्कार करु लागल्या. प्रदक्षिणा घालू लागल्या, प्रदक्षिणा घालत असतांना मनोभावानं म्हणू लागल्या,

"देवा मला असंच अहेव मरण येऊ दे, हिरव्या चुडयानं, पिवळ्या पातळानं, भरल्या मळवटानं, जाऊ दे." एवढेच नव्हे तर अहेव म्हणून तुझं स्थान मृत्युनंतरही कायम राहील यासाठी हिंदू सणामध्ये एक अविधवा-नवमीची तिथीपण घालून टाकली."[२८] आणि अशा या व्यवस्थेच्या चौकटीचा या ठिकाणी लेखिकेने धिक्कार केला आहे. कारण समाजात स्त्रिला कितीही गोंडस बनविले तरी ती एक भोगदासी एक वस्तूच म्हणून ती मेली काय, वाचली काय सारखीच त्यामुळे ती एक सहचारिणी ही कल्पना देखील उरत नाही. म्हणून मग अशा अहेवपणाचा स्वीकार का करावा हा या ठिकाणचा महत्वाचा मुद्दा वाटतो.

अनेक अनुभवाप्रमाणेच लेखिका ज्या वस्तीत रहात होत्या वाढल्या त्या वस्तीतील त्यांचे त्या दिवसाचा मनावर पगडा बसलेला. अनेक अनुभवाने मनाचे काहुर उडालेल त्यामुळे त्यांनी जे पाहिजे तेथे आपल्या लेखातून व्यक्त केले. त्या ज्या वस्तीत वाढल्या त्या वस्तीचे वर्णन सुरवातीलाच करतात ती वस्ती म्हणजे - " सुसंस्कृत माणसांची संस्कृती इकडे फिरकलीच नाही. समृध्दी येथे नेहमीसाठी ओसाड राहिली. देवाधर्माची सोंग मात्र इतर हिंदू वस्त्याप्रमाणें तशीच चालत राहिली. रूढीचाधर्म बनला, खरा धर्म कोणाला कळलाच नाही. जादूटोणा, भूतखेत, आखती नांदल्या, उतारे, चुन्द्रे सर्व प्रकार या वस्त्यांना गवसलेले असतात. कोंबडया, बक-यांना व दारूच्या नैवद्याने यांचे देव पावत असतात. देव पावल्यावरही संतृप्ती या वस्त्यांमध्ये कधी आलीच नाही. उच्च जातीच्या लोकांच्या नजरा या वस्त्यांना घृणेनं न्याहळत जातात. त्या कधीच सहानुभूतीत ओथंबलेल्या नाहीत. आपुलकीनं तुडुंब भरल्या नाहीत. मध्यम जातीच्या बहुजन सवर्णाच्या डोळ्यात या वस्त्यातील माणसांसाठी विखारी अंगारभरलेला असतो. "साले माजतात" त्यांच्या लेखी माजोर, मुजोर या वस्त्या बुटांच्या नांवाखाली चिरडून टाकायाच्या असतात. आणि चिरडून टाकण्याच्या संधीची ते नेहमीच वाट पाहत असतात."[२९] अशा सामान्य लोकांची वस्ती सवर्ण हिंदूना मान्य नसते. म्हणूनच वस्तीवर होणारे हल्ले म्हणजे मृत्युची तलवारच नेहमी असावी तशी परिस्थिती आणि या परिस्थितीत होणा-या हल्यांना तोंड देणारी त्या वस्तीतील माणसे यांचे चित्रण केले आहे. ज्या लोकांना ही वस्तीच मान्य नाही त्यांना त्या वस्तीतील लोकाचं जीणं तरी कसे मान्य होणार ? आणि अशा प्रवृ-तीतून होणा-या हल्याला

रामदास डोंगरे, राधाबाई कांबळे, गणपत इत्यादी लोक बळी पडतात. म्हणून या हिंदू धर्माच्या विषयी त्यांच्या मनात जो तिरस्कार निर्माण होतो त्या विषयी त्या लिहीतात - "माझ्या डोळ्यातून न कळत दोन मोठ्ठे अश्रुथेंब गालावर ओघळले. आज मला कळतय ते अश्रुथेंब जसे अंजनासाठी होते तसेच हिंदू धर्मा-विषयीचे आपलेपण असं कायमचं ओघळू दे. हे माझ्या अंतर्मनाला सांगणारे होते."[30] धर्माचा आधार घेवून अमानुष्यपणे छळ करणा-या या लोकाची त्याधर्माचा तो तिरस्कार होता कारण त्यांची वृ-ती त्यांनी जवळून पाहिल्याने असा विचार प्रकट होणे स्वाभाविकच आहे.

कुमुद पावडे यांना विवाहानंतर आलेला एक महत्वाचा व जीव घेणा अनुभव त्या एका लेखातून व्यक्त करतात. मुळात या निच जातीच्या आणि त्यांनी ब्राम्हण या जातीतील व्यक्तीशी विवाह केल्याने त्यांच्या घरी त्यांना दिली जाणारी वागणूक त्यांनी एक आठवणीतून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. "मेडीकल - कॉलेजमध्ये शिकवत असतांना त्यांना आपल्या कांही आठवणी आठवतात. पहिल्या मुलाच्या जन्माच्यावेळी त्यांच्या सास-याकडून मिळालेली वागणूक, त्यांचे वर्णन त्या करतात. खरं म्हणजे आपल्या घरात पहिला मुलगा होणे हे त्या घरातील लोकांचा भाग्याचा व कौतुकाचा दिवस पण त्या ठिकाणी मुलगा होऊनही लेखिकेच्या घरी जराही आनंद होत नव्हता. कारण ती महार म्हणून तिच्या पोटी होणारे मूलही महारच. अशी त्यांच्या सास-याची समजूत म्हणून त्यांनी कोणत्याही प्रकारचे सहाय्य करण्याचे नाकारतात. घरी पैका, धान्य असून आपल्या घरच्या सुनेला कांहीही न देण्याचा निर्णय त्यांचे सासरे घेतात व जात ही कल्पना त्यांच्या डोक्यात असे म्हणूनच ते आपल्या मुलाचाही संबंध तोडायला उठतात.- "त्याले जाऊन सांग, थो मेला मले आन् मी मेलो त्याले "[31] अशा टोकाला त्यांचा विचार जातो. तेंव्हा लेखिका म्हणतात - " बापा मुलाचं रक्ताचं नातं देखील विसरायला लावणारी ही " जात " कोणत्या नराधमानं निर्माण केली, कोणा या नीच व्यवस्थेनं ही जात कुठीची व्यवस्था निर्माण केली. मी शिकलेली आहे ब्राम्हणांची विद्या असलेल्या संस्कृत विषयात माझं प्रभुत्व आहे. जात न ओळखू येण्याइतकी मी सुसंस्कृत आहे. माझ्यात काय कमी आहे ? की माझ्याशी लग्नामुळे

माझ्या सास–यांच्या अंत:करणातील एकुलत्या एक पोराविषयी प्रेमाचा झराच आटावा ? मला हीन का समजावं ? माझ्या जातीला हीन का समजण्यात यावं ? याचा बदला मला घेतलाच पाहिजे आणि मी जर बदला घेईन, जास्तीत जास्त ही जातपात तोडण्यासाठी मी आंतर जातीय विवाह करून देण्यात मी पुढाकार घेईन. जात मिटवण्यासाठी याच्यापेक्षा उत्तम पर्याय नाही."[32] आपल्या वाटयाला आलेले दु:ख हे त्यांनी ओळखले म्हणून ती जातच नष्ट व्हावी हा विचार त्याच्यात रुजू लागतो. कारण त्यांना माहिती आहे की –" धर्मात बांधलेल्या जाति व्यवस्थेच्या चाकोरीत येथील माणसं झापडं बांधलेल्या घाण्याच्या बैला प्रमाणें पिढयान पिढया चाललेली आहे. येथे माणसाला, माणसापासून दूर करणारा धर्म आहे. माणसं माणसांशी जोडून न देणारा धर्म या स्थितीला कारणीभूत आहे. जोपर्यंत त्या धर्मात परिवर्तन होत नाही व या धर्माचे मूळ असलेली जाति व्यवस्था नष्ट होत नाही तोपर्यंत भारत दुर्भाग्याच्या शापापासून मुक्त होणार नाही."[33] अशी मानव मुक्तीचा विचार त्यांच्या स्वानुभवातून या ठिकाणी व्यक्त होतांना दिसतो. इतकेच नाही तर सुरवातीला त्यांच्या सासरे मुलाचे तोंड देखील पहात नाहीत पण तेच सासरे नंतर मात्र आपल्या सुनेचे, नातवाचे कौतुक करतात. हा त्यांच्यात झालेला बदल म्हणजे माणसातील असलेला माणुसकीचे दर्शन घडविते म्हणूनच माणूस हा मुळात वाईट नसतो तर जात, धर्म, संस्कार त्याला वाईट बनवत असते. हा विचार मांडला आहे.

आजच्या समाजव्यवस्थेत जशी सामाजिक विषमता असते तशीच ती आर्थिकही आहे. म्हणूनच आज कांही अर्धपोटी भिकारी लोक तर कांही भरमसाठी संपत्ती असणारे असे चित्र दिसते. आणि त्यामुळेच त्यांच्यावर होणारे वेगवेगळे संस्कार, त्या संस्कारातून दिसून येणारी त्यांची धडपड लेखिकेने आपण पाहिलेल्या कांही लोकांच्या माध्यमातून सांगितल्या आहेत. एखादी व्यक्ती जन्मते तिथेच त्याच्या संस्काराला सुरवात होते. मग ती श्रीमंतात जन्मली तर त्याचे म्हणून एक प्रतिष्ठित पणाचे, सभ्यतेचे संस्कार केले जातात. व गरीबीत जन्मली तर त्या लोकांच्या पध्दतीने संस्कार होत असतात. हे संस्कार म्हणजे

त्याच्या आयुष्यातील एक चाकोरीबध्द जीवन होऊन जाते. त्यातच त्याला जगावे लागते. ही परिस्थीती पाहून त्या लिहीतात - " केवळ चाकोरीतून तेच ते जिवन जगण्या-या जीवाचं संस्कार हे एक पांगळेपण या पांगळेपणानं अगतिक होऊन अनेकांना लाचारीनं जगताना पाहिलंय मी. क्रूर धार्मिकतेच्या अधिष्ठानावर घडलेल्या या हिंदू समाजाच्या उणिवांना परिपुष्ट केलंय या संस्कारांनी नव्हे, त्याच कमकुवतपण जपलंय, माणुसकीच्या जाणिवांना लावलं, दंभाला वाढवलं आणि ढोंगीपणाला पुरस्कृत केलं पदियानपिदया असंच होत राहिलं. सुसंस्काराच्या डांगोइयातून हे सांडपाणी काळाकाळातूनं झिरपत राहिलं. जन्माला येणारा नूतन जीव हे सांडपाणी पिऊनच आलेला. अन् एखादा कोणी स्वच्छतेचा विचार करू लागला, हे सांडपाणी सडकं आहे हे नष्ट केले पाहिजे. असं सांगू लागला किंवा स्वत:च्या विचाराचं व कृतीचं जंतुनाशक द्रुव्य त्यावर ओतू लागला तर तो महान विद्रोही ठरला, भयानक बंडखोर ठरू लागला. कारण त्यांनं सनातन सडक्या मुल्यांना फेकण्यासाठी हात घातलेला असतो. असा विचार मग काळाच्या ओघात सामाजिक लोंढा प्रवृत्तीच्या उलटया प्रवाहात वाहत होता. त्यांच अस्तित्वही उरत नाही. आणि एखाद्याचं अस्तित्व ठरलच तर इतिहासाच्या पत्रावळ्या झालेल्या कागदोपत्रीच फार तर जयन्त्या आणि पुण्यतिथीमध्ये प्रत्यक्ष अस्तित्वाच्या खुणा मिटलेल्या असतात. "[३४] अशा प्रकारे संस्कारातील फोलपणा सांगून परंपरेने आलेल्या या संस्काराविरुध्द कोणी संघर्ष केला तर त्याची होणारी दयानियता याचीही होणारी आठवण त्या करून देतात. म्हणून त्यांना हा संस्कार जीव घेणा वाटतो. याचा प्रत्यय त्यांना पाहिलेल्या दरिद्री मुलांच्यातून येतो. एका बाजूला प्रचंड संपत्तीची उपभोग घेणारा वर्ग आणि दुस-या बाजूला पोटाची वितभर खळगी भरणारा वर्ग यांच्यातील प्रचंड तफावत त्यांनी आपल्या संस्कार : एक जीवघेणी आगळीक या लेखातून व्यक्त केली आहे.

एकूणच कुमुद पावडे यांच्या १२ लेखांचा विचार केल्यास त्यांच्या स्त्री-मनातील जे अनुभव आहे, त्यातुन जे विचार सुचले, जे जीवन पाहिले, याचा उल्लेख त्यांनी केला आहे. हे करत असताना त्यांनी आपल्या जीवनानुभवाचे चित्रण तर

केलेच आहे. पण हे करत असताना भारतीय समाज संस्कृती, रुढी परंपरा यामुळे स्त्रीला भोगावे लागणारे दु:ख याचेही चित्रण नकळतपणे केले आहे. त्यांच्या समस्या फक्त त्यांच्या पुरत्याच मर्यादित नाहीत तर त्या समस्या संबंध स्त्री-जातीच्या आहेत. एक स्त्री म्हणून मांडलेला जीवनानुभव जसा श्रेष्ठ आहे. तसाच एक संवेदनशील लेखीका म्हणूनही त्यांचे कांही लेख कांही वेगळे विषय घेऊन येतात. म्हणूनच मा. निषाद धगधगती वस्ती, संस्कार : एक जीवघेणी आगळीक इ. लेखांमधून समाज जीवनाचे चित्रण केले आहे. यावरून असे म्हणता येईल की आजपर्यंत स्त्री लेखिकांनी केवळ स्त्री समस्या, स्त्री चित्रण यावर लेखन केले आहे. पण आज हा मुद्दा थोडा बाजूला होण्यास हे पुस्तक कारणिभुत ठरले आहे. म्हणजेच स्त्रीयांचेही अनुभव, विश्व, विचार क्षमता विस्तारलेली आहे. असें वाटते. म्हणून स्त्रीवादी साहित्याचा विचार करता त्याच्या साहित्यातील केवळ स्त्री चित्रणाचा विचार न होता त्यांच्या वैचारिकतेचा, साहित्य मांडणीचा ही वेगळ्या पध्दतीने विचार व्हावा. थोडक्यात स्त्रीवादी साहित्याची व्यापक विचार होणे गरजेचे आहे. असे या ठिकाणी म्हणावेसे वाटते.

या एकूणच आत्मकथनात्मक लेखामध्ये आलेल्या अनुभवाचा जेंव्हा स्त्रीवादी दृष्टीकोनातून विचार करतो. तेंव्हा आपणास त्यातील वेगळेपणा, वेगळी जाणिव, अनुभव, स्त्रीचे विश्व, त्याची दाहकता दिसून येते. स्त्री म्हणून तिच्या वाट्याला आलेले जीवन आणि त्या जीवनाचे तिने केलेले चित्रण हे एकूणच स्त्रीमुक्तीचया दिशेने जाणारे आहे. असे म्हणावेसे लागते. यामध्ये पारंपारिक रुढीमुळे आपल्या वाट्याला आलेले जीवन कसे स्त्री जीवनाचा कोंडमारा करणारे आहे. आणि अशा पारंपारिक बंड केल्याचे या ठिकाणी दिसून येते. हे बंड करणे म्हणजे ती जागृत होऊन तिच्यात वैचारिकता निर्माण झाली म्हणूनच ती अशा पारंपारिकते विषयी म्हणते - " मन व बुध्दी न्याळत ठेवणारं दोन समाचं सावित्रीव्रत मी धुळीसारखं फुंकर घालून उडवून दिलेलं होतं.सावित्रीची सत्यवान तिच्यावर अतिशय प्रेम करीत असे. सावित्री शिवाय दुसरी कोणतीही स्त्री त्यांच्या आयुष्यात आली नसेल, तर सावित्रीनं सत्यवान जन्मोजन्मी मिळावा असा आग्रह धरला तर ठिक आहे. पण ज्या नव-यानं

बायको म्हणजे पायातलं खेटर, एवढीच बायकोची किंमत केली असेल आपण स्वत: दुस-या बायकोबरोबर रममान होत असताना पहिल्या बायकोकडून जर दुष्टपणे सेवेची अपेक्षा करत असेल तर अशल्या नव-यासाठी बाईनं सावित्रीचा हेका धरावा हे बुध्दीला पटण्यासारखं नाही."[35]– असे प्रत्येक अनुभव बुध्दीच्या कसोटीवर घासून आजची स्त्री मुक्त होवू पाहते. याचा प्रत्यय या ठिकाणी येतो. परंपरेचा आधार घेवून स्त्रीला दुबळी बनविली आहे. त्यामुळे स्त्री म्हणजे पाया-तील खेटर या विचारालाच धिक्कारण्याचा प्रयत्न करते. अशा धिक्कारातून आपणही माणूस आहोत याची जाणीव तिला करुन द्यायची आहे. अशा माणूसपणाचे जिथे शोषण होते तेथे प्रतिकार करणं हे गरजेचे असते अशा वेगळ्या विचाराने प्रवृत्त झालेल्या या लेखिका आपल्यावर होणा-यावर वेगवेगळ्या क्षेत्रातील अन्यायाचा प्रतिकार करतांना दिसून येतात. या बरोबरच त्यांना आपल्या हक्काची जाणीव झालेचेही दिसून येते. म्हणूनच कुमुद पावडे यांनी राजधानीतील संमेलनाचा हेतू आणि तेथील दिली जाणारी वागणूक याचे स्पष्टीकरण केले आहे. स्त्री कितीही शिकली, पुरोगामी झाली तरी तिच्याकडे पुरुषप्रधान संस्कृतीचा तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन हा पारंपारिक व दुय्यम असाच आहे. अशा दुय्यमत्वामुळेच स्त्रीचा सामाजिक क्षेत्रात जशी पिछेहाट झाली तशीच तिची शैक्षणीक क्षेत्रातही पिछेहाट केली जात असल्याचे दाखविले आहे. कुमुद पावडे यांनी समाज व्यवस्थे-प्रमाणेच शैक्षणिक स्त्रीची स्त्री म्हणून केलेली पिछेहाट आपल्या कांही अनुभवातून स्पष्ट केली आहे. आणि हे स्त्रीवादाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. कारण स्त्रियाकडे शारिरीक दृष्टिकोनातून बघितल्याने स्त्री म्हणजे " चूल, मूल सांभाळणारी, दुबळी, कमकुवत असा जो एक पारंपारिक दृष्टिकोन आहे. त्याला छेद देण्याचा एक महत्वाचा प्रयत्न केला आहे. कारण स्वत: विद्वान, संस्कृतच्या प्राध्यापिका असून देखिल तिच्याकडे समाजाची बघण्याची एक वेगळी संकूचित दृष्टीकोन असल्याने तिला नोकरीसाठी अनेक ठिकाणी धडपडावे लागते. तिला नोकरी मिळते पण जेंव्हा एक ब्राम्हण पुरुषाची पत्नी होते तेंव्हा यावरुन स्त्रीकडे बघण्याचा पुरुषी दृष्टीकोन जातीनिहाय आहे. आजच्या समाज व्यवस्थेमध्ये असलेली स्त्रीचा दर्जा यातुन ती मुक्त होवू पाहते. स्त्रीवादी साहित्याचा एक मूलभूत दृष्टीकोनातून

या अनुभवाची चिकित्सा करतो तेंव्हा हा अनुभव किती दाहक आहे याची जाणीव असल्यावाचून राहात नाही.

आऊट साईडच्या अनुभव सांगताना एक वेगळाच विचार या ठिकाणी मांडला आहे. स्त्रीवादामध्ये परंपरेला, रुढीला धिक्कारणारी स्त्री ही पुरुषा-प्रमाणे समान दर्जासाठी धडपडत असली तरी ती केवळ माणूस म्हणून जगू पहाते. हे करत असताना ती माणूस पणातही आपण " स्त्री " आहोत याचा विसर पडू देत नाही. कारण स्त्रीवादात म्हटल्याप्रमाणे स्त्रीयांना माणूस म्हणून जगायचे आहे पण पुरुष सत्ताक कुटुंबात स्त्री म्हणून असलेली आपली आयडेंटी जपायची आहे. आणि याचा प्रत्यय या आऊट साईडवर येतो. स्त्री ही कितीही कठोरपणे वागत असली तरी तिचे एक हळवे मन तिला लपवता येत नाही. ती पुन्हा कांही वेळा गहिंवरुन येतांना दिसते. तिचे गहिंवरणे हे भावनिक आहे. पण ती पूर्णपणे भावनेच्या आहारी नाही. तिच्यात शिक्षणाने जागृती आली आहे. म्हणून प्रत्येक वेळी आपली आयडेंटी बरोबर " स्व"च्या अस्तित्वाचा शोध घेत असल्याचे दिसते. हे करत असतांना आपल्या वाट्याला आलेल्या या व्यवस्थेची ती कारण मिमांसा करु लागली आहे. आपल्याला माणूस म्हणून जगण्याचा पहिला अधिकार देणा-या फुल्यांचा विचार आणि त्या विचाराने प्रवृत्त होवून स्त्री मुक्त झाली का ? आणि आपल्या मुक्तीप्रमाणे संपूर्ण स्त्री जात ही मुक्त आहे का ? याचा अलिप्तपणे विचार करते. तेंव्हा ज्या फुल्यांनी स्त्री मुक्तीचा विचार महाराष्ट्रात केला त्या फुल्यांचा आज कोणी विचार करतात का ? याची खंत व्यक्त करुन स्त्रीने केवळ स्वत:पुरते मुक्त होऊन चालत नाही. तर संपूर्ण स्त्री मुक्तीचा विचार केला पाहिजे हा एक महत्वाचा विचार प्रकट केला आहे.

अंत:स्फोटाचा स्त्रीवादी दृष्टीकोनात जेंव्हा आपण विचार करतो तेंव्हा स्त्रियांनी स्त्रियांच्या विषयी लिहिलेले लिखाण यापेक्षा त्यातून आलेल्या

स्त्रीमुक्तीचा विचार किती प्रभावी आहे यावर जास्त भर दिला आहे. स्त्रीही आता स्वत:च्या आयुष्याचा स्वत: अलिप्तपणे विचार करू लागली आहे. आजपर्यंत पुरुषाच्या सहाय्याने जगणारी प्रत्येक निर्णयात पुरुषाचा आधार घेणारी अशी स्त्री आज पूर्ण स्वतंत्र होऊन विचार करू लागली आहे. इतकेच नाही तर ती आता आपल्या आयुष्याचा जोडीदार निवडीचा स्वत:पुढाकार घेत आहे. हे बंधनाच्या पलिकडे यातून दाखवून विवाह संस्थेत स्त्रीला स्वत्वाचे आलेले भान त्यामुळे तीने घेतलेले निर्णय हे महत्वाचे आहेत. अंत:स्फोट या कलाकृतीचा असा स्त्रीवादी दृष्टीकोनांतून विचार करतो तेंव्हा असे बरेच अनुभव हे या कसोटीवर सिध्द होताना दिसतात. हे अनुभव अधिक धारदारपणे येतात याबाबत लेखिका म्हणते. " अंत:स्फोट स्वकथनपर आहे. स्वानुभवभाष्यपर आहे. कधी हे भाष्य परखड होते. शब्द जळजळत्या बाणाचे रूप धारण करतात. विषमतावादी अन्यायी वृत्तीला रक्तबंबाळ करतात त्याला माझा नाईलाज असतो. भारतीय समाजातील विषम व्यवस्थेवर आधारलेली संस्कृती जेव्हा व्यक्तीच्या किंवा व्यक्तिसमूहाच्या मनाचे लचके तोडते. संवेदनशीलता घायाळ करून सोडते तेंव्हा माणूस म्हणून माझे किंवा आमचे जखमी व्यक्तिसमूहाचे अस्तित्व काय हा प्रश्न बुध्दीला सारखा कुरतडत असतो. त्यामुळे मेंदू फुटेल की काय अशी अवस्था होऊ लागते. ही अवस्था त्याच सक्षम शब्दात व्यक्त होऊ लागते तेंव्हा " अंत:स्फोट " होऊ लागतो. माझी अंत:स्फोटाची ही धारणा आहे. अर्थात असे जरी असले तरी या अनुभव कथनात अधिक भर हा जाती व्यवस्थेमुळे झालेले स्त्रीचे शोषण यावरच आहे. त्यामुळे एकूण स्त्रीवादाच्या संदर्भात या लिखाणाच्या मर्यादा जाणवत असल्या तरी यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे स्त्रीवादाला एक वेगळे परिमाण देण्यात ही लेखिका यशस्वी झाली आहे. असे म्हणता येईल.

पुरुषी समाज व्यवस्थेखाली दबलेले तिचे मन बंड करायला निघते. यामध्ये –

१) स्त्रीपुरुष समानता

२) स्त्रीच्या बुध्दिचा योग्य तो सन्मान

३) पारंपारिक विचारांना छेद देऊन –

" स्वत्वा " ची जाणीव निर्माण करणे हे स्त्रीवादाचे वैशिष्टय यात आढळते. बुध्दिप्रामान्यवाद हा केवळ विचारा पुरता नाही तर प्रत्यक्ष व्यवहारात यातून कांही प्रश्न निर्माण करणे आणि याची सुरवात स्वत:च्या जीवना-पासून करणे हे धाडस या लेखिकेने दाखविले आहे. तर्क-शुध्द मांडणी, कुठेही भावनेच्या आहारी न जाणे आणि तरीही आपले स्त्रीपण मानाने जपणे हा एकूणच स्त्रीवादी संकल्पनेचा अविष्कार आहे. आणि तेच अंत:स्फोटचे वैशिष्टय आहे.

## संदर्भ सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रा. कुमुद पावडे | ... | अंत:स्फोट (दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने) |
| २) | प्रा कुमद पावडे | ... | अंत:स्फोट पृ. क्र. ९ |
| ३) | कविता | ... | पृ. क्र. ९ |
| ४) | कविता | ... | पृ. क्र. १० |
| ५) | कविता | ... | पृ. क्र. १० |
| ६) | कविता | ... | पृ. क्र. ११ |
| ७) | कविता | ... | पृ. क्र. १३ |
| ८) | कविता | ... | पृ. क्र. १७ |
| ९) | कविता | ... | पृ. क्र. १८ |
| १०) | कविता | ... | पृ. क्र. १८ |
| ११) | कविता | ... | पृ. क्र. १९ |
| १२) | कविता | ... | पृ. क्र. २८ |
| १३) | कविता | ... | पृ. क्र. ३१ |
| १४) | कविता | ... | पृ. क्र. ३९ |
| १५) | कविता | ... | पृ. क्र. ३९ |
| १६) | कविता | ... | पृ. क्र. ४० |
| १७) | कविता | ... | पृ. क्र. ४१ |
| १८) | कविता | ... | पृ. क्र. ४१ |
| १९) | कविता | ... | पृ. क्र. ४७ |
| २०) | कविता | ... | पृ. क्र. ५० |
| २१) | कविता | ... | पृ. क्र. ५१ |
| २२) | कविता | ... | पृ. क्र. ५१ |
| २३) | कविता | ... | पृ. क्र. ५२ |
| २४) | कविता | ... | पृ. क्र. ५४ |

| | | | |
|---|---|---|---|
| २५) | कित्ता | .... | पृ. क्र. ५५ |
| २६) | कित्ता | .... | पृ. क्र. ५८ |
| २७) | कित्ता | ... | पृ. क्र. ६० |
| २८) | कित्ता | .... | पृ. क्र. ६२ |
| २९) | कित्ता | ... | पृ. क्र. ६५ |
| ३०) | कित्ता | ... | पृ. क्र. ६९ |
| ३१) | कित्ता | ... | पृ. क्र. ७४ |
| ३२) | कित्ता | .... | पृ. क्र. ७७ |
| ३३) | कित्ता | .... | पृ. क्र. ७९ |
| ३४) | कित्ता | .... | पृ. क्र. ८१ |
| ३५) | कित्ता | .... | पृ. क्र. ९० |
| ३६) | कित्ता | .... | प्रस्तावना |